**महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेतंर्गत उर्वरित अनुदान वितरीत करणेबाबत. भद्रावती नगर परिषद, जि. चंद्रपूर**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : नादव- २०१६/प्र.क्र. २६/पापु-२२**
गो.ते. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,लोकमान्य टिळक रोड, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख : १० ऑक्टोबर, २०१७

**वाचा :-**

**१) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. : नादव २०१०/प्र.क्र. २१९/पा.पु. २२, दि.२५.६.२०१०**
**२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र . : नादव २०१०/प्र.क्र. २९६/पा.पु. २२, दि. ४.१.२०११**
**३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. : नादव २०१०/प्र.क्र. ५०८/पा.पु. २२, दि.१४.१.२०११**
**४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. : नादव २०१२/प्र.क्र.९६/पा.पु. २२, दि.१७.२.२०१२**
**५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. : नादव २०१२/प्र.क्र.१२१/पा.पु. २२, दि.१.३.२०१२**
**६) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. : नादव २०१२/प्र.क्र.१५५/पा.पु. २२, दि.१६.३.२०१२**
**७) शासन निर्णय, समक्रमांक दि.३०.३.२०१७**

**<u>प्रस्तावना</u> :**

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्यामध्ये महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत राज्याच्या नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालये उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भीय दिनांक २५ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करताना अनुसरावयाची अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे दिनांक १४ जानेवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली आहे.

२. सदर योजनेंतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबीयांना खाजगी नळ जोडण्यासाठी रु. ४०००/- प्रतिकुटुंब तर वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी रु. १२०००/- प्रतिकुटुंब अनुज्ञेय आहे. या योजनेअंतर्गत खाजगी नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प प्रस्तावाच्या एकूण किंमतीच्या ९०% शासकीय अनुदान अनुज्ञेय असून १०% रक्कम लाभार्थी किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

३. महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत, भद्रावती, जि. चंद्रपूर या नगर परिषदेस मंजूर करण्यात आलेली उपांगे, किंमत, अनुज्ञेय अनुदान, नगर परिषदेचा स्वहिस्सा, भद्रावती नगर परिषदेस वितरीत अनुदान याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूर उपांगाचे नाव | मंजूर किंमत | अनुज्ञेय अनुदान-९०% | नगर परिषदेचा सहभाग-१०% | वितरीत अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| नादव २०१२/ प्र.क्र.९६/पापु २२, दि.१७.२.२०१२ | १.खाजगी नळ जोडणी- ३५१<br>२.वैयक्तिक शौचा.- १६३<br>३.खाजगी नळ जोडणी + वैयक्तिक शौचालय- ४५३<br>४. वितरण वाहिनी | ३४,२७,००० | ३०,८४,००० | ३,४३,००० | ३०,८४,००० |
| नादव २०१२/ प्र.क्र.१२१/पापु २२, दि.१.३.२०१२ | वितरण वाहिनी | २,५५,२९,००० | २,२९,७६,१०० | २५,५२,९०० | १,७६,१३,०५० |
| नादव २०१२/ प्र.क्र.१५५/पापु २२, दि.१६.३.२०१२ | नळ जोडणी + वैयक्तिक शौचालय - ४५३ | ७३,९३,००० | ६६,५४,००० | ७,३९,००० | ६६,५४,००० |
| एकूण | | ३,६३,४९,००० | ३,२७,१४,१०० | ३६,३४,९०० | २,७३,५१,०५० |

४. सदर योजनेंतर्गत भद्रावती नगर परिषदेस एकूण रु.१,६३,५६,०५०/- अनुदान वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, भद्रावती नगर परिषद यांनी सदर वितरीत अनुदानाची रक्कम तसेच शासन निर्णय, दि.१.३.२०१२ प्रमाणे नगर परिषदेच्या सहभागाची रक्कम रु. २५,५२,९००/- भद्रावती नगर परिषदेने संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली असल्याचे कळविले आहे. तसेच शासन निर्णय, दि.१७.२.२०१२ व दि.१६.३.२०१२ अन्वये मंजूर एकूण ९६७ लाभार्थ्यांनी योजनेमधील १०% स्वहिश्श्याची रक्कम स्वत: खर्च करण्याची हमी दिली असून उक्त १०% स्वहिश्श्याची रक्कम लाभार्थी स्वत: करणार असल्याचे प्रमाणपत्र मुख्याधिकारी, भद्रावती नगर परिषद यांनी सादर केले आहे.

५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे यांनी दि. ५.२.२०१३ च्या पत्रान्वये सदर योजनेंतर्गत, भद्रावती नगर परिषदेस शासन निर्णय, दि. १.३.२०१२ अन्वये मंजूर -वितरण व्यवस्थेच्या एकूण रु.२,३८,३७,४४०/- निव्वळ किंमतीस तांत्रिक मान्यता दिली आहे.

६. मुख्याधिकारी, भद्रावती नगर परिषद यांनी एकूण रुपये १६३.५६ लक्ष रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असुन अनुज्ञेय अनुदानापैकी उर्वरित अनुदान वितरीत करण्याची विनंती केली आहे. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, चंद्रपूर यांनी दिनांक २२.८.२०१६ च्या पत्रान्वये सदर योजनेंतर्गत, भद्रावती नगर परिषदेस, शासन निर्णय, दि. १७.२.२०१२, दि. १.३.२०१२ तसेच दि. १६.३.२०१२ अन्वये मंजूर उपांगांची तपासणी करुन उपांगनिहाय पुर्ण झालेल्या कामांचा अहवाल सादर केला आहे. (त्याप्रमाणे- खाजगी नळ जोडणी- ३५१ पुर्ण, वैयक्तिक शौचालय - १४८ पुर्ण; वितरण वाहिनी- लांबी १६७७२ मीटर अंथरणे पुर्ण; खाजगी नळ जोडणी + वैयक्तिक शौचालय - १६६ पुर्ण.)

७. सदर योजनेकरीता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये शिल्लक असलेली तरतुद रु.१,०९,९५,०००/- च्या मर्यादेत भद्रावती नगर परिषदेस वितरीत करावयाचे अनुदान रु. १,६३,५८,०५०/- पैकी रु.१,०९,९५,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यास संदर्भाधिन क्र. ७ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. सबब, सदर योजनेकरीता सन २०१७-१८ करीता उपलब्ध तरतुदीमधून उर्वरित रु.५३,६३,०५०/- अनुदान भद्रावती नगर परिषदेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> **:**

महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेतंर्गत, भद्रावती नगर परिषदेस शासन निर्णय, दि. १.३.२०१२ अन्वये मंजूर उपांगांकरीता अनुज्ञेय असलेल्या अनुदानापैकी उर्वरित अनुदान रु. ५३,६३,०५०/- (रुपये त्रेपन्न लाख त्रेसष्ट हजार पन्नास फक्त) वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयांत)

| शासन निर्णय क्रमांक व दिनांक | मंजूर किंमत | अनुज्ञेय अनुदान- ९०% | नगर परिषदेचा सहभाग १०% | भद्रावती न.प. ने सहभागापोटी जमा केलेली रक्कम | यापुर्वी वितरीत अनुदान | वितरीत करावयाचे अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| नादव २०१२/ प्र.क्र.१२१/ पापु २२, दि.१.३.२०१२ | २,५५,२९,००० | २,२९,७६,१०० | २५,५२,९०० | २५,५२,९०० | १,७६,१३,०५० | ५३,६३,०५० |
| एकूण | | | | | | ५३,६३,०५० |

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च "मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, महानगर

पालिका/ नगरपरिषदांना सहाय्य - (०२) राज्य योजना - (१२) महानगरपालिका व नगरपालिका यांच्या (स्थानिक संस्था) नागरी भागांतील अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबियांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालये यासाठी सहायक अनुदान (२२१५ ९३१६), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास सादर करावेत.

४. सदर योजनेंतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित नागरी संस्थेने शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक:- नादव-२०१०/प्र.क्र.२१९/पापु-२२, दिनांक २५/६/२०१० व क्रमांक:-नादव-२०१०/प्र.क्र.५०८/पापु-२२, दिनांक १४/१/२०११ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१७१०१०१११७२९५७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873e6409c70b0a0219d717dd6767c9aec9dd2d61ecf0cc982e9e93ef57312675, cn=Sunil Jairam Tumram
Date: 2017.10.11 12:12:23 +05'30'

**( सु.ज. तुमराम )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
७. महालेखापाल-१, मुंबई
८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर

९. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई,
१०. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
११. मुख्याधिकारी, भद्रावती नगर परिषद, जि. चंद्रपूर
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर
१३. जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
१४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. कक्ष अधिकारी, पापु ०४, पापु २०, पापु २१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई,
**१६.** निवडनस्ती.